06

VOLUME-IV, ISSUE-XII
ISSN (Print): 2394-207X
IMPACT FACTOR: 4.205
INTERNATIONAL JOURNAL OF MULTIFACETED AND MULTILINGUAL STUDIES

**TITLE: INTERNATIONAL JOURNAL OF MULTIFACETED AND MULTILINGUAL STUDIES**

## UGC Approved Research Journal (Sr. 47674)

**Editors: Dr. V.H. Mane, Prof. M. P. Shaikh**

**Language: Multilingual**

**Published by**

**INTERNATIONAL JOURNAL OF MULTIFACETED AND MULTILINGUAL STUDIES**

**Sneh Apartment,**
**Flat No. 001, Samarth Nagar, New Sangvi,**
**Pune- 411027**

**Copyrights: Editors 2014**

**All rights reserved**

**ISSN: 2394-207X (Print)**
**IMPACT FACTOR: 4.205**

**VOLUME-IV, ISSUE-XII**

**December -2017**

राज्यातील स्थानिक संस्थांमध्ये महिलांसाठी राखीव ज।गा

| स्थानिक संस्था | संख्या | एकूण जागा | महिलांसाठी राखीव |
|---|---|---|---|
| महानगरपालिका | २६ | २६२४ | १३१८ |
| नगरपरिषद | २३० | ५०२३ | २५९५ |
| नगरपंचायत | ११० | १८७० | ९९० |
| जिल्हा परिषद | ३४ | २००६ | १०१३ |
| पंचायत समिती | ३५१ | ४०१२ | २००६ |
| ग्रामपंचायत | २७९२० | २२३८५७ | १११९२९ |
| एकूण | २८६७१ | २३९३९२ | ११९८५१ |

(संदर्भ- महाराष्ट्राची आर्थिक पाहणी २०१५-१६, पान नं-१५९)

**महिलांच्या राजकीय समावेशनामुळे स्थानिक राजकारण सकलजनवादी:** महिलांच्या राजकीय समावेशनामुळे राजकारणाचा रंग पालटला. याचा अर्थ राजकीय प्रक्रियेचे स्वरूप बदलले. महिलांच्या राजकीय समावेशनामुळे राजकारणातील प्राधान्यक्रम बदलले. महिलांच्या दैंनदिन जीवनामध्ये भेडसविणाऱ्या समस्या राजकारणाच्या विषयपत्रिकेच्या मध्यभागी आल्या. पाणी हा घटक विषयपत्रिकेचा केंद्रबिंदू झाला. पिण्यासाठी शुध्द पाणी उपलब्ध झाले पाहिजे, कुंटूबासाठी, गावासाठी, जनावरांसाठी, शेतीसाठी पाणी उपलब्ध करून देण्यासंदर्भातील निर्णय-निश्चिती करण्यावर भर देण्यात येवू लागला. दारूबंदी, बालविवाहावर बंदी, बालकामगारांवर बंदी हे प्राधान्यक्रम बनले. त्याचबरोबर कुंटूब-नियोजन, कौंटुबिक हिंसा, मुलांना ज्ञान व कौशल्या आधारित शिक्षण याबाबत निर्णय घेतले जावू लागले. महिलांच्या राजकीय समावेशनामुळे भष्ट्राचारविरहीत व्यवस्था निर्माण होण्याची प्रक्रिया सुरू झाली. भष्ट्राचार करणार नाही व करू देणार नाही अशी महिला प्रतिनिधींनी भूमिका घेतल्याने व्यवस्था परिवर्तन घडून येवू लागले. महिला राजकारणात प्रवेश करताना लोकप्रतिनिधी म्हणून प्रवेश करतात. त्या आपल्या जातीची अस्मिता विसरतात. त्याचबरोबर कोणतेही कार्य यशस्वी करण्यासाठी त्या पक्षभेददेखील विसरून जातात.

ज्या महिलेकडे घराचा उंबरठा ओलांडून सार्वजनिक जीवनामध्ये सहभाग घेण्याचा आत्मविश्वास नव्हता. त्या महिला आत्मविश्वासाने घराची चौकट ओलांडून सार्वजनिक क्षेत्रामध्ये निर्णय-निश्चीतीचे राजकारण करित आहेत. ज्या महिला घरामध्ये कार्य करित होत्या. परंतु आरक्षणातून त्यांना सत्ता प्राप्त झाल्याने लाल दिव्याच्या गाडीत फिरून त्या जिल्हाबाबतचे निर्णय घेवू लागल्या. महिला सबलीकरण प्रक्रियेने पुरूष अधिसत्ता व वर्चस्वाच्या पारंपारिक संकल्पनांना आव्हान दिले आहे. महिला उत्कृष्ठ काम करू शकणार नाहीत, त्या वेळ देवू शकणार नाहीत, राजकारण ही चौवीस तासाची ड्युटी असते. राजकारणातील धावपळ महिलांना पेलवणारी नाही, सार्वजनिक व्यवहारांचे व्यवस्थापन करण्याची क्षमता महिलांमध्ये नाही. यासारख्या महिलांबाबत असणाऱ्या अनेक भ्रामक विचारांना महिला सबलीकरण प्रक्रियेतून शह मिळाला आहे. महिला या पुरूषांपेक्षा उत्कृष्ठ लोकप्रतिनिधी आहेत हे त्यांनी सिध्द करून दाखविले आहे. महिला लोकप्रतिनिधी गावामध्ये हजर असतात. त्यामुळे कोणतीही समस्या निर्माण झाली तरी त्या नेहमीच उपलब्ध असल्याने त्या समस्येची सोडवणूक सहजपणे होते. याउलट पुरूष प्रतिनिधी सतत फिरत असतात. ते गावापेक्षा शहरांमध्ये जास्त वेळ असतात. अशी प्रतिक्रिया निवडून आलेल्या महिलांनी दिलेली आहे. महिला पुरूष प्रतिनिधीपेक्षा उत्कृष्ठ कार्य करीत आहेत. याचे सर्व श्रेय शरद पवारांच्या अधुनिक दृष्टीकोनाला देता येते.

**कृषी संस्था व संशोधनाला पुर्नजिवित करणारे धोरण:** २००४ मध्ये पहिल्यांदा संयुक्त पुरोगामी आघाडी शासनाच्या कालखंडामध्ये कृषी खात्याला शरद पवाराच्या रूपाने पुर्ण वेळ मंत्री मिळाला तसेच कृषीखात्याशी संबंधित सर्व खाती म्हणजे अन्नप्रक्रिया, पशुपालन, अन्न, नागरीपुरवठा आणि ग्राहक कल्याण, जलसंधारण ही खाती पहिल्यांदा एकत्रित करण्यात आली. यामुळे एकजिनसी दृष्टीकोन व समन्वय निर्माण होवू शकला. कृषी क्षेत्रातील संशोधनाला गती देण्यासाठी कृषीक्षेत्राचा कणा असलेली आयसीएआर या संस्थेला ताकद देण्यावरती भर देण्यात आला. म्हणजेच आयसीएआर अंतर्गत येणाऱ्या सर्व संस्थांमध्ये शास्त्रज्ञांची भरती, त्यांना जागतिक पातळीवरिल संशोधन संस्थांमध्ये काम करण्याची संधी व आयसीएआर अंतर्गत येणाऱ्या सर्व ऐंशी संस्थांना स्वायतत्ता देण्याचे धोरण आखले गेले. कृषी मंत्राल्य केवळ नियोजन व निधीला मान्यता देईल त्यानंतर मंत्रालयाचा आयसीएआरच्या कामामध्ये हस्तक्षेप असणार नाही असा नियम केला गेला. संशोधकांना प्रतिष्ठा, संस्थेला स्वायत्तता आणि संशोधनाचा भक्कम पाया यामुळे आयसीएआरचे पुनरूजीवन झाले तसेच शेतीसाठी उच्च प्रतीच

भागाच्या आर्थिक सक्षमीकरणाचा प्रयत्न केला. शहरी लोकसंख्या वाढत असल्याने शहरी विकासा संदर्भातही धोरणे आखली. एकूणच त्यांनी ग्रामीण व शहरी हितसंबंधाचा समन्वय प्रस्थापित करणारे धोरण आखले.

**सामूहिक नेतृत्व व सामूहिक सत्संकल्प:** सामूहिक वाटाघाटी, सामूहिक नेतृत्वातील सांधेजोड, सामूहिक राजकीय कृती, विविध वर्गांना राजकीय सत्तेतील वाटा देणे आणि एकत्रित नेतृत्वाने काम करणे ही शरद पवारांच्या नेतृत्वाची खास वैशिष्ट्ये सांगता येतात. राजकीय सत्तेचे सामूहिक पातळीवर नियंत्रण हा घटक महत्वाचा ठरतो. विविध गटांच्या प्रतिनिधित्वाचे दावेदेखील करते. नेतृत्व हे समाजाप्रति उत्तरदायी असते. सामूहिक नेतृत्व वंचिततेएवजी समावेशनाचे धोरण स्विकारते. लोकशाही विचारांशी सुसंगत अशी भूमिका घेते. जातीय विषमता, मूलतत्ववाद, व जमातवाद यांना पवारांनी स्पष्टपणे नाकारले. समाजाच्या हिताचा मुद्दा त्यांनी सद्सद्विविवेकबुध्दीला अनुसरून निवडला.

**सारांश:**सत्तरीच्या दशकापासून आर्थिक पेचप्रसंग उभे राहिले. तसतसे सामाजिक संबंध तणावाचे झाले. शरद पवार सकलजनवादी किंवा सामूहिकतावादी राजकारण करत आहेत. त्यामुळे त्याचे व्यक्तीमत्व सकलजनवादी आहे. बागायतदार शेतकरी, जिरायत शेतकरी, गावकरी, छोटे व्यापारी, छोटे उद्योजक, अकुशल कामगार यांचा समग्र आणि एकत्रित विचार शरद पवार यांनी केला होता. या अर्थाने सर्व वर्गाचे हितसंबंध म्हणून शरद पवार हे सकलजनवादी ठरतात. तसेच दुसरा महत्वाचा मुद्दा म्हणजे त्यांनी विविध जातीचे एकीकरण केले. सामूहिकपणे कामाची प्रेरणा दिली. विविध जातीमधील सामाजिक सलोखा कायम राखला यावरती भर दिला. ओबीसी, दलित, महिला अशा वंचित घटकांच्या विकासासाठीची धोरणे आखली. कला, क्रिडा, साहित्य, संस्कृती या क्षेत्राच्या विकासासाठी प्रयत्न केले. पुरोगामी व सुसंस्कृत महाराष्ट्र घडविण्यामध्ये महत्वाची भूमिका निभावली या तपशिलावरून असे दिसते की, शरद पवारांचे नेतृत्व सकलजनवादी आहे.

## संदर्भ

१) पवार शरद, २०१६, लोक माझे सांगाति, राजहंस प्रकाशन, मुंबई
२) पवार प्रकाश, २०१४, भारतीय राजकारण आणि नेतृत्वाची वाटचाल, डायमंड प्रकाशन, पुणे.
३) पवार प्रकाश (संपा), २०१७, महाराष्ट्रातील निवडणुकीय राजकारणातील मैलाचा दगड राजकीय अर्थकारण, डायमंड प्रकाशन, पुणे.
४) गायकवाड जयदेव, अरूण खोरे (संपा), कृतीशील परिवर्तनवादी शरद पवार (सामाजिक न्याय विशेषांक) १२ डिसेंबर २०१३, पुणे.
५) पवार वैशाली, २०१२, महिलांच्या सत्तासंघर्षाचा आलेख, डायमंड प्रकाशन, पुणे.
६) देशपांडे पद्मभूषण, २०१६, पर्व प्रगतीचे परिवर्तनाचे, यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई.
७) भोंगळे सुधीर, कृषी क्रांतीचे उदगाते शरद पवार, १२ डिसेंबर २०१७, लोकसत्ता, पुणे.
८) Kandge Ram, 2015, Sharadrao Pawar :A mass Leader, Madhuraj publication, Pune.